# प्रभुतरुण

वर्ष ५२ | अंक १ | मुंबई | ऑगस्ट, २०१८ | पाने ६ | किंमत रु. १

*(स्थापना : तारीख २५ ऑगस्ट १९२३)*

**तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी?**

**www.prabhutarun.org**

*संपादिका:* **सुहासिनी कीर्तिकर**

*कार्यकारी संपादक मंडळ :* **मिनाक्षी जयकर, मयुरा नायक, संजना कोठारे, वैजयंती कीर्तिकर**

*सहाय्यक संपादक:* **त्वरिता दळवी, राजेश नवलकर, भक्ती शेटये**

*संपादकीय*

## 'आत्माचि विठ्ठलु...'

**—सुहासिनी कीर्तिकर**

'आषाढस्य प्रथम दिवस' मागे सरला की येते आषाढी एकादशी. आषाढातला धुंवाधार पाऊस भक्तिचा महापूर सागर होऊन या एकादशीला चंद्रभागेचे कोरडे वाळवंट भिजवून टाकतो. एरवी द. मा. मिरासदारांनी पाहिलेले, रेखाटलेले पंढरपूर इरसाल माणसांनी भरलेले असते. चंद्राच्या कोरीसारखी वहाणारी चंद्रभागाही एरवी तशी भागलेलीच असते. वाळवंट भगभगीत अन् तापत्या संसारासारखे रखरखीत असते. पण 'आषाढी'ची चाहूल लागली की चंद्रभागेतले पाणी (सरकारी यंत्रणेमुळे वा नैसर्गिक स्रोतामुळे) दुथडी भरून वाहू लागते. या दो थडांवर हलके हलके भक्तभाविकांच्या भक्तीचा सागरच उचंबळू लागतो. 'युगानयुगे' कंबरेवर हात ठेवून समचरण विठोबा या सागरी लाटांच्या उचंबळ्यात चिंब होऊ लागतो. महाराष्ट्राच्या भक्तिपंथाने भावभोळ्या वेडेपणातून साकारलेले हे विठ्ठलाचे सगुण रूप आषाढीला नटते-थटते. भक्तभाविकांच्या भोळ्या भक्तीचा हेलावणारा सागर स्थिर मतीने, स्थिर चित्ताने पहाते. कंबरेवर कायम हात ठेवून! पहा; इतर सगुण रूपात असलेल्या अनेक देवदेवतांच्या हस्तमुद्रा काहीतरी संकेतात्मक वरदान देत असतात. म्हणजे त्रिशूलधारी हात भक्तांच्या संकटांचे मोचन करतात. हाती डमरू असेल तर नर्तनमुद्रेतून भक्तमनात आनंद नाचवतात. वरदहस्तमुद्रा असेल तर 'सुखी रहा' हा संदेश देत ते भक्तांचे संरक्षणही करतात. आशीर्वाद देतात की ज्यामुळे संसारी माणूस आश्वस्त होत जातो. कुणा हाती लक्ष्मीचे प्रतिक असे कमलपुष्प असते, कुणा हाती मोदक. कुणा हाती क्रूरपणाचे पारिपत्य करणारे राक्षसमुख; तर कुणा हाती सारस्वताचे वरदान असणारी वीणा. पण 'भिऊ नकोस, मी तुझ्या पाठीशी आहे' असं म्हणणारी, दर्शवणारी या स्वरूपाची कुठलीही हस्तमुद्रा विठ्ठलाची नाही. त्याचे दोन्ही हात आपले त्याच्या कमरेवर! विठ्ठल हा मुळात 'नवसाचा देव' नाही. म्हणूनच 'हे केले तर मी अमूक करीन'- 'ते केलेस तर मी तमूक करीन' असली देवाणघेवाणीची रोखठोक व्यवहारी भाषा विठ्ठलचरणी कुणीच करीत नाही. तो फक्त 'भावाचा भुकेला' असतो. 'मनी नाही भाव अन् देवा मला पाव देव बाजारचा भाजीपाला नाही रं, देव अशानं पावायचा नाही' अगदी खरे आहे. तुकोबांनी 'आवा निघाली पंढरपूरा! तिचे चित्त उरले घरा।।' असं म्हणत पंढरपुरची वारी कशी असावी ते दृष्टान्त देऊन सांगितले आहे. हा देव फक्त 'भावाचा भुकेला' आहे. आज सात शतकांहून अधिक काळ 'कर कटिवरी' ठेवून हा 'कर्नाटकी' विठ्ठल उभाच आहे.

तो उभा केलाय भक्तजनांनी. तो जीवंत ठेवलाय वारकऱ्यांनी. हे वारकरीही कसे? शेतकरी-कुणबी, महार, चांभार आदी दलित, माळी, कासार, सोनार, कुंभार अशा तळागाळातल्या निरक्षरांपासून साक्षर भटाब्राह्मणापर्यंत अगदी सगळेच. दासदासींपासून वेश्येपर्यंत विठ्ठलाचे भक्त. महाराष्ट्राची पुण्याई किती थोर! चारी वर्णांमधला 'भेद अमंगळ' नाहीसा करीत या सगळ्या थरातल्या विठ्ठलभक्तांनी अध्यात्मिक, सामाजिक समानता निर्माण केली. यामुळे मराठी कवितेतील भक्तिरसही दुथडी भरून वाहू लागला. सर्व थरांतील भक्तांनी अभंग, ओवी रचना उत्स्फूर्तपणे केल्याने अभंग वाङ्मयातही नवनवीन प्रतिमा, दृष्टान्त आले. आगळेपणाने. हे जे 'कवतिक' महाराष्ट्रात घडले त्याला दुसऱ्या प्रान्तात, देशात तोड नाही. ही संतमंडळी आपआपल्या भाषेत, व्यावसायिक दृष्टांताचा आधार घेत व्यक्त झाली. जना दासी 'दळिता कांडिता' विठ्ठलाला आळवू लागली. गवंडी भक्त 'भक्तीचा ओळंबा लावुनि विठ्ठल पहावा' म्हणू लागला. 'कांदा मूळा भाजी। अवघी विठाबाई माझी।' असं सावता माळ्याला म्हणावंसं वाटलं. 'मडकं पक्कं करण्याची' भाषा मुक्ताबाईने गोरा कुंभाराला ऐकवली. तुकोबा वाणी 'भक्तीचा सौदा' पटवू लागला तो 'आम्ही केवळ भारवाही' या भूमिकेतून. गाढवांवर माल लादून दुष्काळात गावोगावी फिरणारा तुका वाणी यातून प्रगट झाला. कान्होपात्रा वेश्या. तिच्या अभंगात विठूरायाशी सर्वस्वदानाचा सौदा होतो. 'आम्ही सोनार सोनार' म्हणत नरहरी सोनार देवाशी भक्तिमोलाचा व्यापार करून नामाचा चोख 'मलिदा' लाटतो. 'सावळा विठूराया' खरं तर काळ्याकुट्ट रंगाचाच. पण या साऱ्या भक्तांच्या नजरेतून, हृदयातील भक्तिभावातून तो चक्क 'पांडुरंग' होतो. म्हणजे गोऱ्या रंगाचा. 'सावळे सुंदर रूप मनोहर' पहाताना त्याची आभा या सकळ भक्तांना 'दिव्य शोभा'च दाखवते.

कुठलेही निमंत्रण नसताना ('आवतण' नसताना), कुठलीही जाहिरात नसताना, कुठलाही आकर्षक मनोरंजनाचा कार्यक्रम नसताना आज इतकी शतके, (शतकानुशतके) भक्तांची पावलं आषाढी आली की भक्तीचे 'सर्व सुख' लुटण्यासाठी पंढरपुराकडे वळतात. किती मोठी लोकशाही ही! येथे कुणीही उच्चनीच नाही. राजा फक्त एकच. पंढरपुरचा अनभिषिक्त सम्राट साक्षात पांडुरंग. त्याच्या सोबत तितकीच समविचारी, अबोलपणे उभी रहाणारी 'राणी रखुमाबाई'. माणसं बदलली. काळ बदलला. सुखसोयी, चैन आदींची व्याख्या बदलली. यंत्रयुगानं मनं कुरतडली. ध्येयधारणांना कसर लागली. तरीही या भक्तीभावाच्या पुरात कुठेही कसर नाही. अकरा लाखांचा यावर्षीचा भक्तिचा महापूर काय सांगतो? 'विठ्ठल मुखें म्हणा! विठ्ठल मुखे म्हणा।' आणि 'पंढरीची वाट' चाला. मग त्या संदर्भात कुठे राजकारण डोकावले, अटीतटीचा प्रसंग निर्माण झाला... काही 'निरोध' पाकिटांचा वापर झाला, अनैतिक व्यापार झाला...; एवढ्या मोठ्या प्रमाणात असा भक्तिचा जल्लोष झाला की थोडेफार होणारच ना हे सगळे! होऊ नये... पण....?

पण त्यातही एखादे 'हरियाली' प्रोजेक्ट लाखो बियांचे वितरण करून वारकऱ्यांच्या हातून 'वृक्षदान' करते, एखादे डॉक्टरांचे - नर्सेसचे पथक अहोरात्र राबून वारकऱ्यांच्या आरोग्याची काळजी घेते, वारकरी गावात आले की गावातल्या घराघरातून पिठलं-भाकरी यांच्यासाठी जमा होते. एखादा वारकरी थकला भागला तर दुसरा त्याला पाठुंगळी घेऊन खऱ्या अर्थाने 'विठ्ठल विठ्ठल' मंत्र आचरणात आणतो. हा मंत्र जयघोषात निनादता निनादता 'ठ्ठल विठ्ठल' होतो, पण त्यात अनाम अशी भक्तिची धुंदी असते. आपापला संसार नेटका करीत करीत अशा माणसांनी 'परमार्थ विवेक' साधलेला असतो.

असं वाटतं की विठोबाचे दर्शन होवो न होवो; या विवेकी वारकऱ्याचे दर्शन पुरेसे आहे. त्याला 'उराउरी' भेटले की साक्षात 'पांडुरंग भेटला की वो!' आपण अशावेळी 'देवबाभळी' झालो ना? समजा असं नाही 'उराउरी' भेटता आलं, पंढरपुरी नाही जाता आलं तरी भक्तिमार्गाचा एक सोपा उपाय आहेच ना आपल्यापाशी! कोणता? अहो 'पाठारे प्रभु सोशल समाजा'ची दरवर्षी होणारी अभंगयात्रा! त्या यात्रेत सामील झालो तरी आपण 'वारकरी' होतो. एका गाण्यात एक ओळ आहे पहा; - 'एक एक खांब वारकरी झाला' तसं आपणही या पंढरपुरी न जाताच भक्तिभावनेत दंग होऊन वारकरी होतोच.

'आषाढी'लाच फक्त नव्हे; तर 'दिनी दिनी प्रतिदिनी' चला तर आपण 'विठ्ठल नामाचा टाहो' करीत विठ्ठलमय (ईश्वरमय) होऊ या. जेथे 'मी पणालाच लागो इंगळी' अशा ठिकाणी लीन होऊ या. आपलं शरीरच पंढरी अन् आत्मा पांडुरंग! पांडुरंग, पांडुरंग म्हणत आयुष्याची आषाढी आनंदाने साजरी करूयात.

# लठ्ठपणाविरोधी लढवय्याची अखेर!



रविवार, २९ जुलै २०१८ रोजी सकाळी ७.०० वाजता डॉ. विनोद आनंदराव धुरंधर यांनी जगाचा निरोप घेतला आणि खऱ्या अर्थाने एका लढवय्याची अखेर झाली!

हा लढवय्या वेगळा होता. ५० वर्षांहून अधिक काळ लठ्ठपणाविरुद्ध मोहिम चालविणारा डॉक्टर अशी ख्याती त्यांनी मिळविली होती. ‘‘ऊऊर्ष ध्इ ऊर्ष उळर्थ्ठ’’ ह्याच यथोचित नाव लाभलेल्या त्यांच्या पुस्तकामध्ये त्यांनी केलेल्या संघर्षाची पूर्ण माहिती आपल्याला वाचायला मिळते. आज ‘‘धेग्ू ण्दहेर्ल्ेूहू’’ हे जागोजागी दिसतात. परंतु ज्या काळामध्ये ‘जाडजूड, गुबगुबीत असणे’ ही प्रकृतीस्वास्थाची व्याख्या होती, त्या काळात स्थूलपणाचे शरीरावर होणारे दुष्परिणाम लोकांपर्यंत पोहोचविण्याचे धारिष्ट्य डॉक्टरांनी केले. प्रथम स्वत:वर आणि नंतर आप्तजनांवर केलेल्या निरनिराळ्या प्रयोगांमधून चरबी घटविण्याची आहारासंबंधित पद्धत त्यांनी शोधून काढली.

आपले संशोधन स्वत:पुरते मर्यादित न ठेवता ``Association of Advanced Research in Obesity" ह्या संस्थेची स्थापना केली. आज या संस्थेचे जाळे संपूर्ण देशभर पसरले आहे आणि `Obesity' च्या क्षेत्रात कार्य करणारा प्रत्येकजण त्याचे श्रेय असोसिएशनचे पहिले अध्यक्ष डॉ. विनोद धुरंधर यांनाच देतो. उत्तम, निष्णात डॉक्टर आणि `Obesity' विषयातील तज्ज्ञ असा लोकिक त्यांनी मिळवलाच; परंतु तत्त्वप्रिय व सचोटीने केलेला त्यांचा व्यवसाय कौतुकास्पद होता. चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध तारे, मोठमोठे राजकीय नेते, तसेच अनेक उद्योगपती अशा अनेकांनी त्यांचा लाभ घेतला; परंतु आपल्या व्यवसायात डॉक्टरांनी त्याचे कधी भांडवल केले नाही.

धुरंधरांच्या ‘नानी-निवास’ मध्ये डॉ. विनोद धुरंधरांनी सर्वाधिक काळ व्यतित केला. नानी-निवास या वास्तुने आजपर्यंत कित्येक समारंभ व कार्यक्रम पाहिले आहेत. डॉ. विनोद धुरंधरांची उपस्थिती प्रत्येक कार्यक्रमाची पायरी उंचावत होती, ती त्यांच्या प्रसन्न व्यक्तिमत्वाने व त्यांच्या नावाला साजेशा विनोदबुद्धीने!

आपण मिळविलेल्या ज्ञानाचा व अनुभवाचा वारसा आपल्या मुलाला म्हणजेच डॉ. निखील यांना त्यांनी दिलेला आहे. वयाच्या ९३व्या वर्षी शांतपणे, समाधानाने त्यांनी या जगाचा निरोप घेतला. ‘‘वैद्यकीय क्षेत्रात एका नव्या युगाची स्थापना करणारा डॉक्टर’’ म्हणून इतिहास त्याची नोंद ठेवेल. त्यांना आमची भावांजली.

# पाठारे प्रभु सोशल समाज

## अभंगयात्रा

शनिवार दिनांक २८-७-१८ रोजी पाठारे प्रभु चॅरिटीजच्या व्यंकटेश मंदिरात सायंकाळी ४ वाजता पा. प्र. सोशल समाजाची अभंगयात्रा सुरू झाली. समाजाचे विश्वस्त श्री. अजित तळपदे यांनी प्रास्ताविक करून गेली छत्तीस वर्षे अखंडपणे सुरू असलेल्या अभंगयात्रेचे कौतुक केले. १९८६ साली सुरू झालेल्या या अभंगयात्रेत सहभागी होणाऱ्यांची संख्या लक्षणीय आहे; तेव्हा समाजातर्फे एखादे संगीत नाटक सादर व्हावे; अशी सूचना त्यांनी केली. त्यानंतर समाजाध्यक्ष स्वाती राणे यांच्या अतिशय सुरस, अभ्यासपूर्ण अशा निवेदनासह अभंगयात्रा सुरू झाली. सुरुवात कु. प्रणाली राणे हिच्या गणेश वंदनेने औचित्यपूर्ण अशीच झाली. प्रणाली ही बालकलाकार. विवान आगासकर या बालकलाकाराचेही ‘अच्युतं केशवं’ हे स्तुतिगान कौतुकास्पद होते. या अभंगयात्रेत वैदेही राणे, स्नेहा राणे, शीतल कोठारे, स्वप्ना विजयकर, वीणा अजिंक्य, शलाका विजयकर, विद्युत नायक, किरण तळपदे या गायकांनी सहभाग नोंदवला. श्री. जयकर याने ‘कानडा राजा पंढरीचा’ बहारदार म्हटले. कौमुदी राणे हिने स्वत: पेटी वाजवून ‘तू सुखकर्ता तू दुखहर्ता’ म्हणून गणेशस्तुती केली. रजनी कोठारे यांचे ‘निसदीन बरसत नैन हमारे’ भावपूर्ण होते. सीमा कीर्तिकर यांनी ‘मोलकरीण’ मधील ‘देव जरी’ सादर केले. श्री. मिलींद सेंजित यांचे ‘शोधीसी मानवा’ श्रवणीय होते. ‘मोगरा फुलला’ म्हणून देवश्री धुरंधर यांनी श्रोत्यांच्या मनात भावरस अवस्था फुलवली; तर मुग्धा विजयकर आगासकर यांचे ‘सुंदर ते ध्यान’ मोहवून गेले. वर्षा धुरंधर यांनी ‘तुज मागतो मी आता’ म्हणत भक्तिभाव साकारला. सुरेखा राणे देवरूखकर यांनी ‘आन मिली’ हे हिंदी पद आळवले तर लगेच चिंतामणी कीर्तिकर यांनी ‘अवघे गर्जे पंढरपूर’ म्हणून भक्तिभाव जागवला. डॉ. हर्षद विजयकरांचे ‘रखुमाई रखुमाई’ गुंजत गेले. देवश्री धुरंधर यांनी ‘तुझे रूप चित्ती राहो’ ही कामना गाण्यातून व्यक्त केली. डॉ. रश्मी

(पान ६ कॉलम ३ वर)

उद्यम्

# Profitable लिक्विड फ्लोअर क्लिनर बिझनेस

**-सुदेश प्रबोध देसाई**

लिक्विड फ्लोअर क्लिनर सगळीकडे वापरण्यात येणारे उत्पादन आहे. प्रत्येक घरी, हॉटेल, हॉस्पिटल्स्, शाळा, कॉलेजेस्, फास्टफुड सेंटर्स, ऑफिसेस् , रेल्वे स्टेशन्स्, एअरपोर्ट, इतर सर्व ठिकाणी वापरात येणारे उत्पादन आहे. लिक्वीड फ्लोअर क्लिनरचा व्यवसाय हा नेहमी वाढतच जातो. सध्या भारतामध्ये लिक्विड फ्लोअर क्लिनरचे भरपूर मार्केट आहे. हे लक्षात घेऊन आपण ह्या विषयावर अभ्यास करूया.

लिक्विड फ्लोअर क्लिनर बनविण्यासाठी लागणारे घटक:

✶ डायपेन्टिन
✶ टर्की रेड ऑईल
✶ पाईन ऑईल

**कृती:**

१ कच्चा माल सम प्रमाणात उपलब्ध करून घेणे.
२ कोणतेही दोन पदार्थ घेऊन ब्लेंडरद्वारे २० मिनिटे मिक्स करावे.
३ तिसरे घटक मिक्स करून परत ब्लेंडरने २० मिनिटे मिक्स करावे.
४ पाणी पाचपट/आठपट/दहापट/बारापट किंवा १५ पट ग्राहकांच्या गरजेप्रमाणे ब्लेंडरने २० मिनिटे मिक्स करावे. (आवश्यक असेल तर कलर व ऍरोमा मिक्स करावा.)
५ आकर्षक बाटल्यामध्ये लेबल लावून पॅक करावे.
६ पॅकिंग केलेले उत्पादन ग्राहकांपर्यंत पोहोचवावे.
७ भरपूर नफा कमवणे.

आपले प्रॉडक्ट चांगल्या दर्जाचे (प्रतीचे) करण्यासाठी वरील कृती योग्य रीतीने करावी. ह्या मिश्रणात सिटेनोल ऑईल मिक्स केले असता मॉस्कीटो रिपेलेंटचेपण काम करेल। वरील मिश्रणात कापूर वापरले असता वास्तुमध्ये पॉझिटिव्ह एनर्जी आणण्याचे काम करते.

**कॉस्टिंग :**

१ लिटर लिक्विड क्लिनर बनविण्यासाठी साधारण किंमत रु. २५ येते. ब्रँडेड लिक्विड फ्लोअर क्लिनर बाजारामध्ये रु. १२५ ते रु. २५० पर्यंत विकले जाते.

जर आपण फक्त ५,००० बाटल्या दिवसभरात बनविल्या आणि आपण रु. २५ नफा प्रति बॉटल ठेवला तर आपल्याला ५,००० बॉटल्स x रु. २५ = रु. १,२५,०० दिवसाला नफा.

तसेच महिन्याला रु. ३१,२५,००० नफा.

तसेच वार्षिक रु. ३, ७५,००,००० नफा होऊ शकतो.

जर हा नफा जास्त वाटत असेल तर आपण १००० बॉटल्स दिवसाला बनवुया.

१००० बॉटल्स x रु. २५ (नफा) = रु.२५,००० प्रति दिवस

रु. २५,००० x रु. २५ = रु. ६, २५,००० प्रति महिना

रु. ६, २५,००० x १२ महिने = रु. ७५,००,००० प्रति वार्षिक होवू शकतो.

ह्या प्रकारचे इन्कम आपल्याला कोणत्याही नोकरीमध्ये बघायला मिळत नाही. Business only can give you Extra Ordinary Income. मग कशाला थांबायचे?. आतापासूनच आपला लिक्विड क्लिनरचा व्यवसाय सुरू करूया.

मग पुढचा प्रश्न असा येतो की ५,००० बॉटल्स रोज बनविल्या तर विकायच्या कशा? हे खूपच सोपे आहे. आपण आपले प्रॉडक्ट किराणामालाच्या दुकानातून, केमिस्टच्या दुकानातून, मॉल्समधून, ऑनलाईन सेल्स करून व इतर सरकारी टेंडरद्वारे सप्लाय करू शकतो. ही लिस्ट न संपणारी आहे. जर हे रिटेल्सच्या दुकानातून विकायचे असेल तर आपण ५० बाटल्या एका दुकानात विकायला दिल्या तर १०० दुकानामधून आपण ५००० बॉटल्स दिवसाला विकू शकतो. हे दोन सेल्समनद्वारे आपले टार्गेट पूर्ण करू शकतो. हा व्यवसाय भरपूर नफा देणारा होऊ शकतो. अधिक माहितीसाठी

सुदेश प्रबोध देसाई-९२२३३५७२०७
इमेल: 7sdesai@gmail.com

✳

कथाकली

# परिस्थिती

-सौ. उज्ज्वल र. ब्रह्मांडकर

''या ना आत'' - तेजसच्या आईनं दरवाजात उभ्या असलेल्या सुशांतच्या आईचं स्वागत केलं आणि विचारलं - ''आज इकडे कुठे?''

''तेजसकडेच आलेय...''

''काही विशेष?''

''होय हो. हल्ली सुशांत दिवसभर घरीच असतो. रात्री बाहेर जातो. मध्यरात्री कधी तरी घरी येतो. तेजस बरोबरच तो जायला हवा ना? म्हणून विचारायला आले. हल्ली मोटरही येत नाही त्याला पिकअप करायला. कधी कधी पाच तासांच्या आतच परत येतो. काळजी वाटते हो. ह्यांची परिस्थिती तुम्हाला माहीतच आहे. ॲक्सिडंट झाल्यापासून नोकरी सुटली त्यांची. त्यांची काळजी करता करता आता ही नवीन चिंता लागली नशिबाला.''

''अहो अशा घाबरू नका. रजा वगैरे घेतली असेल त्यानं''

''छे हो! नवीन नोकरी आहे त्याची-शिवाय हल्ली अशा रजा मिळत नाहीत. तेजससुद्धा त्याला हाक मारायला येत नाही..'' सुशांतची आई बोलत असतानाच तेजस बाहेर आला. त्याला बघताच तिनं त्याला विचारायला सुरुवात केली- ''अरे तेजस, तू हल्ली ऑफीसमध्ये जाताना सुशांतला हाका मारायला येत नाहीस? एरव्ही तुम्ही दोघं आमच्या घरापाशीच मोटारीत बसायचात ना?''

''हल्ली तो माझ्या आधीच जायचा. तो लवकर जाऊन ऑफीसमध्ये जिममध्ये व्यायाम करतो. हल्ली अशी सोय असते. पूर्वी आम्ही एकत्र येत होतो पण आता नसतो. त्याची शिफ्ट आणि प्रोसेस म्हणजे सेक्शनसुद्धा आता बदललाय.''

''हल्ली तुम्हाला मोटार येत नाही का न्यायला आणि परतायला? ''असते की! अं... का?... तो मोटारनं येत नाही? तुम्ही त्याला विचारलंत का?''

''विचारलं नं! पण तो हल्ली नीट उत्तर देत नाही. तुला माहीत असेलच, आमची खूप भांडणं होतात... अं. एक विचारू? तू तुझ्या पगाराचं काय करतोस?''

तेजसच्या मनात आलं - खरं सांगितलं तरी मी पगाराचा कसा योग्य विनियोग करतो आणि सुशांत कसा करीत नाही ह्या मुद्यावर त्याच्या घरी भांडण होईल...

आणि खोटं सांगितलं तर माझी आई माझ्यावर रागावेल. तो उघडपणे एवढंच म्हणाला, ''मी आईबाबांच्या सल्ल्यानं काय ते करतो.''

''हंऽऽ'' सुशांतची आई सुस्कारा टाकीत म्हणाली - ''सुशांत असं करत नाही. तू सांग नं रे त्याला समजावून. घरखर्चासाठी त्यानं नको का पैसे द्यायला? उगीचच कपड्यांवर, फालतू गोष्टींवर आणि तऱ्हेतऱ्हेच्या परफ्युम्सवर खर्च करीत बसतो...'' सुशांतची आई बराच वेळ सुशांतबद्दल तक्रारी मांडत बसली होती.

कधी तेजसची आई तिच्या सुरात सूर मिसळून बोलत होती तर कधी तिला समजावण्याचा प्रयत्न करीत होती. तिच्या मनात आलं - काठावरच्या माणसानं पोहताना बुडण्याची शक्यता असलेल्या माणसाला कोरड्या सूचना करून काय उपयोग? पण त्या परिस्थितीत तेजसच्या आईला यापेक्षा वेगळं सहकार्य करणं शक्य नव्हतं... शेवटी सुशांतची आई न राहवून म्हणालीच ''तुम्ही किती नशीबवान आहात हो तेजसच्या आई! तुम्हाला तेजससारखा समजूतदार आणि हुषार मुलगा लाभला...'

''सुशांतसुद्धा हुशार आहे हं मावशी'' - तेजसनं पटकन मित्राची बाजू घेतली.

''खरंय तुझं म्हणणं तेजस. माझा सुशांत खूप हुषार आहे. पण परिस्थितीनं चिडतो कधी कधी. परिस्थितीच माणसाच्या वागण्याचा वेगवेगळा अविष्कार घडवते.''

परिस्थिती!.... पुन्हा पुन्हा सगळ्यांच्याच विचारांची गाडी ह्या एकाच शब्दावर नी त्रिकालाबाधित सत्यावर येऊन आदळते. परिस्थिती...? कधी आर्थिक, कधी सामाजिक तर कधी कधी भावनिकसुद्धा!.... तेजसच्या मनात विचार येत होते... ही परिस्थिती निर्माण करणाराही माणूस... ह्या परिस्थितीचा बळी ठरणाराही माणूस... आणि परिस्थितीचा आधार घेत स्वत:च्या वागण्याचं समर्थन करणाराही माणूसच... परिस्थिती... काही माणसांना आपल्या प्रवाहाच्या जोरावर कुठंही, कसंही, कितीही वाहवत नेणारी... काहींना अतिशय समंजस बनवणारी, तिऱ्हाईताच्या नजरेतून फक्त माणसांना जबाबदार ठरवणारी तर काहींच्या मनात जबरदस्त आत्मविश्वास निर्माण करणारी....

परिस्थितीचं आणखी बरंच पृथ:करण तेजसच्या मनात केलं असतं. पण तेवढ्याच सुशांतची आई बोलू लागली. तिकडे लक्ष देणं त्याला भाग पाडलं - ''मला त्याची काळजी वाटते. मध्येच एक महिनाभर सकाळी निघायचा नी संध्याकाळी परतायचा. नी पुन्हा थोड्याच वेळात निघून मध्यरात्री घरी यायचा. आता बघावं तर घरातच असतो. डबा नेणं तर त्यानं कधीच सोडलं. मध्यंतरी आमच्यासाठी भारीतल्या चार साड्या आणि ह्यांच्यासाठी दोन शर्ट घेऊन आला.''

''मुलांचा जीव असतो हो आईवडिलांवर'' - तेजसची आई म्हणाली - ''ही तरुण पिढी नं बोलून दाखवत नाही पण मनातून आईवडिलांची काळजीच करत असतात.''

''आपण काहीच करीत नाही का मुलांसाठी?''

''करतो नं! मोजायला गेलं तर तुमच्या प्रेमाचं वजनच जास्त होईल. सुशांतसुद्धा नेहमी हेच बोलतो. तुम्हाला सुखात ठेवायचं म्हणतो नेहमी...' तेजस म्हणाला - ''तुमचं नेमकं खटकतं कुठं?''

''कदाचित आमचे विचार विरूद्ध दिशेला जातात''.. सुशांतची आई उत्तरली.

''किंवा कदाचित आम्ही मुलं आमचं मन, आमचे विचार तुम्हाला नीट उलगडून दाखवू शकत नाही असं असावं...'

''असेलही. पण दुरावा राहतो एवढं मात्र खरं... तुम्ही दोघं मनानं एवढे जवळ कसे?''

''परिस्थितीनं'' - तेजसच्या मनानं चटकन उत्तर दिलं. त्या उत्तराचा प्रतिध्वनी त्याच्या आईच्या मनात उमटला आणि सुशांतच्या आईच्या मनानं तो बरोबर टिपला म्हणून ती म्हणाली - ''खरंय रे! परिस्थिती बदलायला हवीच आमची. पण ती बदलण्यासाठी वस्तूंची; तीसुद्धा महागड्या वस्तूंची गरज काय? हे स्टेटस सिंबॉल्स नसले तर काय बिघडतं?''

''तसं नव्हे मावशी... ज्या वस्तू आमच्याकडे नसतात पण मित्रांकडे असतात त्या आम्हाला ताबडतोब हव्या असतात. ह्या रिकाम्या जागा भरल्या नं की माणसाला पैकीच्या पैकी मार्क्स मिळाल्याचा आनंद होतो. हल्ली स्पर्धा फार वाढलीय. ह्या क्षेत्रातही ती असणारच...''

''मग भले ती जीवघेणी का असेना'' असं म्हणत सुशांतची आई उठली. ती म्हणाली ''तुमचा बराच वेळ घेतला. पण कदाचित मला एक नवा दृष्टिकोन मिळाला सुशांतच्या वागण्याकडे बघण्याचा..''

तिच्या जाणाऱ्या पाठमोऱ्या आकृतीकडे बघत तेजसच्या मनात शब्द उमटले - ''आता फार उशीर झालाय मावशी'' आणि आईला म्हणाला - ''सुशांतच्या आईनं हे समजून घ्यायला फार उशीर केला... आणि सुशांतनं आईला पुढे सांगितलं - ''सुशांत भलत्याच मार्गावर गेलाय गं.'' हे ऐकून तेजसच्या आईला धक्काच बसला... त्यातून सावरून ती म्हणाली, ''आयुष्यातले हे मोह असतात ना ते क्लोरोफॉर्मसारखे असतात - माणसाला गुंगी आणणारे - नी त्या बेहोषीत माणसाच्या हातून जे घडतं ते सामान्यत: पूर्ण शुद्धीवर असणाऱ्यांना अतर्क्य कोटीतलं वाटतं. पण बेहोषीनंतर त्यांना जाग येते तेव्हा बरंच काही घडून गेलेलं असतं, बराच उशीर झालेला असतो. तेजस, सुशांतला धोक्याच्या रस्त्यावरून मागे वळवण्याचा काही उपाय आहे का? आणि असला तर तू तो सुशांतच्या आईला का नाही सांगितलास?''

''आहे. पण तिला तो पटला नसता. कारण दोन पिढ्यांमधलं अंतर...''

''मग तू आणि आम्ही-तुझे आईवडील यांच्यात ते का नाही?''

''आईवडिलांचं आर्थिक स्वास्थ्य जे तुमच्याकडे होतं. लहानपणी ना, दुसऱ्यांकडे आहेत त्या वस्तू आपल्याकडे का नाहीत एवढाच प्रश्न पडतो. ह्याचं उत्तर नाही समजत. त्या वस्तू फक्त आपल्याच घरात असाव्यात आणि आपले आईबाबाच नंबर वन असावेत असं वाटतं. ह्या विचाराला तडा गेला की निर्माण होतात अनेक गुंड, दुसऱ्या चांगल्या मुलांना वाईट मार्गाकडे वळवणारे आणि त्यांच्याकडे खेचले जातात ते अशा भावनांचे बळी ठरणारे अनेक सुशांत. तुम्ही कधीही मला सगळ्या प्रकारची मदत भावनिकसुद्धा कराल, त्याचा मला विश्वास वाटतो. तोच सुशांतला हवाय त्याच्या आईवडिलांकडून त्यांच्या हिमतीचा विश्वास. पण त्यानं स्वत:हून त्यांच्यासाठी काही आणायचं म्हणतो, त्यालाही त्याचे आईवडिल नकार देतात.''

''कारण परिस्थितीच्या निर्झराच्या प्रवाहातून तो एका काठावर फळं, फुल फुलवू पाहतोय तर त्याचे आईवडिल जगण्यासाठी आवश्यक असं धान्य उगवू पाहतायत. दोघेही बरोबर. सगळंच आवश्यक. कपडे गरजेपुरते कॉटनचे की श्रीमंत गर्भरेशमी, पोट भरण्यासाठी भाकरी पण केक का नको, गरजा भागवून उरलेल्या पैशांत भविष्याची तरतूद की आत्ताची चैन एवढेच प्रश्न आहेत. प्रत्येक धबधब्याचा छोट्या काय किंवा मोठ्या काय, लुटता येणारं दृष्टीसुख सारखंच. फरक फक्त दृष्टीकोनामधला. पण शेवटी प्रत्येकाच्या पायाखालची माती नी अंगणामधलं ऊन वेगळंच मोजमाप घेऊन येतं हेच खरं... आपण नुसती चर्चा करून काय उपयोग?'' असं म्हणत तेजसची आई तिची कामं उरकण्यासाठी आत गेली - तिच्या विश्वात नी तेजससुद्धा स्वत:च्या उद्योगात रमला... त्याच्या स्वत:च्या विश्वात...

**संवाद**

# शिक्षणाचा प्रारंभ व नवयुगाची पहाट

**-विश्वास अजिंक्य**

एकोणिसाव्या शतकाच्या सुरवातीला ईस्ट इंडिया कंपनीचा शुद्ध व्यापारी पेशा संपला आणि राज्यकर्त्याची जबाबदारी कंपनीकडे आली. तेव्हा हिंदी जनतेला शिक्षणाने शहाणे करून सोडण्याचा उद्योग कंपनीच्या सूत्रधारांनी हाती घेतला. मुंबई बेटात शिक्षणकार्याची मुहूर्तमेढ रोवली, तेव्हा माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन हा मुंबई इलाख्याचा गव्हर्नर होता. कंपनीच्या नोकरीत त्याने जवळजवळ सारा देश पालथा घातला. कंपनीत नोकरी लागून तो हिंदुस्थानात आला तेव्हा पोरसवदा होता. शिक्षणही फारसे झाले नव्हते; पण नोकरीनिमित्त आशियातील पर्शियनसारख्या भाषांचे ज्ञान त्याने संपादन केले होते. हिंदी जनतेला युरोपातील शास्त्रे शिकवावी अशी तीव्र इच्छा असल्यामुळे मुंबई इलाख्याचा राज्याधिकार प्राप्त होताच तो शिक्षणाच्या कामाकडे वळला. शिक्षणाने लोक शहाणे झाले की ते आपले वर्चस्व झुगारून देतील, शिक्षणाचे अंतिम फळ म्हणजे इंग्रजी राज्याचा अस्त हे भविष्य एल्फिन्स्टनला माहित होते. पण ज्या दिवशी सज्ञान हिंदी जनता आपल्या हातून राज्य हिसकावून घेईल तो दिवस इंग्लंडच्या इतिहासात अत्यंत गौरवाचा समजला जाईल असेही त्याने शिक्षण सुरू करताना आपल्या हाताखालच्या माणसांना बोलून दाखविले होते. आजचे भारतीय स्वातंत्र्य हा त्या विद्यादानाचा अपेक्षित परिणाम आहे.

१८१५ मध्ये स्थापन झालेल्या 'बॉम्बे एज्युकेशन सोसायटी'ने केवळ युरोपियन मुलांना शिक्षण देण्याचे धोरण सोडून हिंदी मुलांनासुद्धा आपल्या शाळेत प्रवेश द्यायला सुरुवात केली. या सोसायटीने १८२० पर्यंत मुंबईत ४ शाळा सुरू केल्या. १८२५ मध्ये सोसायटीने स्थापत्य शास्त्राचा वर्ग काढला. देशी भाषा हे शिक्षणाचे माध्यम होते. त्या वर्गात गणित व भौतिक शास्त्राचे ज्ञान सामान्य शाळेतल्या वर्गाहून जास्त शिकविले जात असे. अमेरिकन मिशनऱ्यांनीदेखील १८१५ मध्ये हिंदू मुलांकरीता शाळा सुरू केली तर १८२४ साली मुलींची शाळा काढली. मुंबई शहरात मुलींचे शिक्षण ही मिशनऱ्यांच्या विद्यादानाची एक महत्त्वाची शाखा होती. मुलांच्या शिक्षणाला जनतेचा विरोध नव्हता. पण मुलींचे शिक्षण म्हणजे समाजावर ओढवणारे गंडांतर अशा समजुतीने त्या शिक्षणाला पोक्त जनता विरोध करीत होती. मुलींना शाळेत नेणे व परत घरी आणून सोडणे ही कामे शिक्षकांना करावी लागत. कालांतराने उच्च शिक्षण संपादून सरकारी नोकरी किंवा डॉक्टर, वकील वगैरे व्यवसायांच्या जोरावर लोकांत मान्यतेस चढलेल्या अनेक व्यक्तींनी स्त्री शिक्षणाचा उघड पुरस्कार आरंभल्यामुळे विरोधाची धार बोथट होत गेली. इंग्रजी व देशी भाषा एकत्र शिकविणारी 'रॉबर्ट कॉटन मनी' ही शाळा १८३५ साली उदयास आली. तर स्कॉटिश मिशनरी सोसायटीचे डॉ. जॉन विल्सन यांच्या पत्नीने १८२९-३० साली मुलींच्या सहा शाळा काढल्या; तर १८३२ मध्ये डॉ विल्सन यांनी मुलांची शाळा काढली.

इंग्रजांच्या शाळा सर्व प्रकारच्या व्यवहारोपयोगी विषयांचे ज्ञान नव्या पिढीला देण्यासाठी होत्या. इंग्रजांचे शैक्षणिक धोरण धर्मनिरपेक्ष होते. इंग्रजांच्या हाती मुंबई बेट येण्यापूर्वी येथे पोर्तुगीजांच्या शाळा होत्या; पण त्या केवळ ख्रिस्ती धर्माचे शिक्षण देत असत. इंग्रजांनी नवीन शिक्षण पद्धती अमलात आणली. तेव्हा व त्यापूर्वी हिंदुस्थानातील मुले अजिबात शिकत नव्हती असं नव्हे; तर गरजेपुरते शिकत. पहाटे स्तोत्रे, भूपाळ्या वगैरे तोंडपाठ म्हणायची, संध्याकाळी बाराखड्या, पाढे यांची उजळणी करायची, घरातील थोरा-मोठ्यांनी देवदेवतांच्या कथा सांगायच्या. असे प्रकार घराघरात साऱ्या देशभर चालत. एखादा स्वयंप्रेरित शिक्षक आजुबाजूच्या घरातील शिकाऊ मुले गोळा करून मोठ्या घराच्या ओसरीवर साऱ्या मुलांना शिकवीत असे. अशा शिक्षकांना फी दर महिन्याला द्यावी लागत नसे. पाडवा, दसरा, दिवाळी वगैरे सणांना गुरूजींना फी, वस्त्रे, पात्रे, रोकड, धान्य, मिठाई इत्यादींच्या रूपाने मिळे. चूक करणाऱ्या विद्यार्थ्याला छडीचा मार सामान्य होता. या ओसरीवरच्या शाळांमध्ये बाके खुर्च्या नसत. रिकामी पोती बैठकीसाठी वापरीत. छापखान्याच्या अभावी पाठ्य-पुस्तकेही नव्हती.

इयत्तावार विषयाची वाटणी, निरनिराळे विषय, शिकविण्याच्या वेळा, परीक्षा हे प्रकार इंग्रजांनी सुरू केले. त्यांनी सुरू केलेल्या शाळेत मुलांना अभ्यासाची पुस्तके आपल्या खर्चाने विकत घ्यावी लागत नसत. सरकारातून एक किंवा दोन प्रती शाळेकरिता येत असत. शिक्षक त्याचे वाचन करीत असत. कधीकधी एखाद्या मुलाने वाचायचे व इतरांनी ऐकायचं असा अभ्यास चाले. शाळेत मुलांना सरकारी कायदे, उपयोगी ज्ञान, बालव्याकरण, भूगोल, पूर्णांक-अपूर्णांक, हितोपदेश इत्यादी विषय शिकविले जात. या व्यतिरिक्त रेशीम पिकविणे, शाळा पद्धती, इसापनीती इत्यादी पुस्तके असत. एकीकडे शाळा एकामागून एक उदयास येत होत्या. त्यात मुलांची भरती सुरू होती. शाळेत शिकविण्यासाठी नेमलेल्या विषयांची पुस्तके मराठी भाषेत तयार करून ती भराभर छापली जात होती. मात्र ही पुस्तके इंग्रजी पुस्तकांची भाषांतरे होती. मुलांच्या बुद्धीची झेप लक्षात घेऊन त्यांच्या योग्यतेची इंग्रजी पुस्तके भाषांतरासाठी निवडण्याची जबाबदारी शाळा खात्याच्या इंग्रज अधिकाऱ्यांवर होती. कौतुकाची गोष्ट म्हणजे हे बहुतेक सर्व इंग्रज अधिकारी मराठी भाषेत निपुण होते. अर्थात त्यांच्या हाताखाली निवडक शास्त्री मंडळी होतीच. तेव्हाच्या शालोपयोगी पुस्तकांनी जगातील अनेक प्रगतीकारक गोष्टींची ओळख विद्यार्थ्यांना करून दिली. शिक्षणाच्या प्रारंभकाळी त्यात भाग घेणारे इंग्रज व शास्त्री मंडळी हे दोघेही विद्यार्थ्यां-संदर्भात अतिशय आस्था बाळगणारे होते. ज्या देशात जाल त्या देशाची भाषा आधी शिका. या इंग्रजांच्या धोरणामुळे संस्कृत, मराठी, गुजराती, उर्दू , तामिळ, पर्शियन अशा भाषा शिकलेले इंग्रज मुंबईत व भारतभर पसरले होते. जनरल व्हॅन्स केनेडी नावाच्या इंग्रजाला तर ५-६ स्थानिक भाषा येत होत्या. तो संस्कृत मध्ये निपुण होता. त्याने १८२४ मध्ये मराठी ते इंग्रजी व इंग्रजी ते मराठी डिक्शनरी तयार करून छापून घेतली होती. तेव्हा इंग्रजी भाषा शिकणे हे दिव्यच होते. ती भाषा शिकणाऱ्या विद्यार्थ्याला शाळेतून परतल्यावर घराच्या बाहेर स्नान केल्याखेरीज घरात प्रवेश मिळत नव्हता. विद्यार्थ्याला इंग्रजी शब्दांचा अभ्यास घरातील माणसांना चुकवून करावा लागे.

१८४५ साली ग्रँट मेडिकल कॉलेज निघाले. ज्यांच्या नावाने हे महाविद्यालय निघाले, ते ग्रँटसाहेब मुंबईचे गव्हर्नर होते. या महाविद्यालयात ब्राम्हणादी वरच्या वर्गातील मुले जाणार नाहीत अशी भाकीते लोक वर्तवीत होते. कारण काय तर शरीरशास्त्र शिकताना प्रेतांची चिरफाड करावी लागेल. शेवटी चिरफाडीने होणारा अपवित्रपणा धुऊन काढण्यासाठी कॉलेजात स्नानगृहाची व्यवस्था केली गेली व ही अपवित्र होण्याची भीती गेली. नव्या हिंदी डॉक्टरांचा व्यवसाय न चालल्यास त्यांना निर्वाहाची चिंता राहू नये म्हणून त्यांना नोकऱ्या देण्याची सोय सरकारने केली होती. १८५७ साली शिपायांचे बंड व भारताचे स्वातंत्र्य युद्ध झाले तरीसुद्धा इंग्रजांनी कलकत्ता, मद्रास व मुंबई या तीन शहरात विद्यापीठे उभारली आणि उच्च शिक्षणाचा पाया रचला. हे इंग्रजांचे भारतीयांसाठी फार मोठे योगदान आहे. विद्यापीठाने आपल्या परीक्षातून उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना पदव्या देण्याचा प्रघात पाडला. त्या पदव्यांचा लोकांत व सरकारात आदर बाळगला जात असे. विद्यापीठातून शिकणाऱ्याला उत्तेजन म्हणून उदार धनिकांनी विद्यापीठात पैसे भरून तसेच देणग्या देऊन छात्रवृत्ती, पदके, रोख बक्षिसे ठेवली. विद्यापीठात प्रवेश घेण्यासाठी मॅट्रिक्युलेशन ही अंतिम परीक्षा ठेवली. तिच्यातले यश हे विद्यापीठाचे प्रवेशद्वार. येथून पुढे वैद्यक, स्थापत्य यांतला जो विषय घ्यावासा वाटेल तो घ्यावा. शिकण्याच्या प्रत्येक विषयाच्या पदव्यांची नावे वेगवेगळी होती. वैद्यक- जी. जी. एम. सी. एल. एम. अँड एस. आता एम. बी. बी. एस. स्थापत्य- एल. सी. ई. आता बी. ई. कायदा- एल. एल. बी. पण एल. एल. बी. च्या आधी विद्यार्थी बी. ए.ची परीक्षा पास झालेला असावा अशी अट होती. १८५९ साली झालेल्या पहिल्या मॅट्रीकच्या परीक्षेला १३२ विद्यार्थी बसले होते. त्यातील २२ जण पास झाले. तर महादेव गोविंद रानडे, रामकृष्ण गोपाळ भांडारकर, बाळ मंगेश वागळे आणि वामन आबाजी मोडक हे मुंबई विद्यापीठाचे पहिले पदवीधर. तर फिरोजशहा मेहता पहिले एम. ए. विद्यापीठाच्या पदव्यांसाठी विद्येच्या निरनिराळ्या शाखा महाविद्यालयातून शिकविल्या जात. त्यामुळे त्या विद्यार्थ्यांची सामान्य जनतेमध्ये योग्यता वाढली. शालांत परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यापेक्षा विद्यापीठाचा पदवीधर ज्ञानाने श्रेष्ठ; असा वाजवी समज लोकांत रूढ झाला. प्रेमचंद रायचंद या शेअर दलालाने दिलेल्या ४.५० लाख रुपयांच्या देणगीतून मुंबई विद्यापीठाच्या ग्रंथसंग्रहालयाची इमारत व त्या लगतचा शिखरावर घड्याळ असलेला राजाबाई टॉवर बांधण्यात आला. राजाबाई हे त्यांच्या आईचे नाव.

१८५१ या वर्षी लंडन शहरातील क्रिस्टल वाड्यात जागतिक कला कौशल्याचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. त्यामुळे इंग्लंडमध्ये कलाकौशल्याच्या शाळा काढण्याची लाट आली. त्यानंतर मुंबईत देखील कलाकौशल्याच्या शाळेबद्दल चर्चा सुरू झाली. कलाकौशल्याला उत्तेजन देऊन चित्रकला शिकविण्यासाठी, कलेचे शिक्षण देणाऱ्या संस्थेसाठी मुंबईतील दानशूर जमशेदजी जिजीभाई यांनी १८५३ साली एक रकमी एक लाख रूपयांची देणगी दिली. त्या रकमेतून जे. जे.स्कूल ऑफ आर्ट ही संस्था १८५७ मध्ये सुरू झाली.

(पान ६ कॉलम ४ वर)

**अद्भूत गोष्टी-**

### अनुभव

# वाटाड्या

**-विनय त्रिलोकेकर**

तुम्ही एका अनोळखी ठिकाणी असता, तुमच्याबरोबर इतर लोक असतात. अचानक आपल्या सोबत असलेले लोक पुढे निघून जातात, तुम्हाला पाठी सोडून. योगायोगाने तुम्ही एकटेच रहाता. एका अनोळखी निर्मनुष्य सुनसान अशा जागेत. सुरवातीला तुमच्या हे लक्षातदेखील येत नाही. आणि ही गोष्ट तुम्हाला जेव्हा समजते तेव्हा फार उशीर झालेला असतो. तुम्ही वाट चुकला आहात आणि पुढचा मार्ग दिसत नाही. भीतीने मनात विचित्र विचित्र विचार येतात, एखादे श्वापद आपल्यावर झडप तर घालणार नाही ना? येथे भूत-खेत असतील तर! तुम्ही देवाचा धावा करता. तुम्ही अंधारात चाचपडत असता आणि तुम्हाला मदतीचा हात येतो, एक आशेचे किरण घेऊन, तुम्हाला मार्ग-वाट दाखवतो एक वाटाड्या. खालील माणसानाही तो नक्कीच भेटलाच असावा.

**एका यात्रेत:**

काही वर्षापूर्वी माझी बहीण,उषा (अमरनाथ, केदारनाथ बद्रिनाथ नक्की कोठे माहीत नाही आणि उषा आता हयात नाही) यात्रेला गेली होती. त्यांचा गट फार मोठा, आठ-दहा परिवार, काही एकटेच, बरेच माहितगार ट्रॅवल एजन्सीचे प्रतिनिधी, व्यवस्थापक आणि मार्गदर्शक, बराच मोठा ग्रुप. मुंबईपासूनचा प्रवास झकास, खाण्यापिण्याची व्यवस्था अतिउत्तम, नाव ठेवण्यास कोठेही जागा शिल्लक नव्हती. देवदर्शनही छान झाले. सारे परतीला लागले. परततानापण ही गुहा बघ, ती गुहा बघ, तो नैसर्गिक नजराणा पहा, ते रमणीय देखावे आपल्या कॅमेऱ्यात कैद करायचा, हे सारे चालूच होते. उषा त्या गाईड्सकडून त्या गुहांबद्धल आणि विविध ठिकाणांविषयी पौराणिक पार्श्वभूमी आणि ऐतिहासिक महत्त्व जाणून घेत होती. ती 'लोकप्रभा' व इतर काही मासिकांसाठी लेख लिहीत असे आणि ह्या ठिकाणांची संपूर्ण माहिती, बारीकसारीक पैलूंची माहिती, जाणून घेणे जरुरीचे होते. ऐकलेली माहिती ती तेथेच बसून लिहून घेत होती. बाकी मंडळी पुढे गेली हे कळताच ती त्यांच्या पाठी धावे आणि त्यांना गाठे. असे बराच वेळ चालले होते.

पार संध्याकाळ उलटून गेली होती. एका गुहेत बसून उषा लिहीत होती. अगदी मग्न होती. सहज तिने आजुबाजूला बघितले. बरोबर असणारी मंडळी तिला पाठी सोडून पुढे निघून गेली होती. ती गुहेतून बाहेर आली. बाहेर कडा होता. ती उलट फिरून दुसऱ्या बाजूने बाहेर पडली. हा रस्ता ते आले होते तोच होता; पण दूरवर कोणी दिसत नव्हते. गुहेत परत गेली. अंधुक उजेडात तिला एक निमुळती पाऊलवाट दिसली. ती चालू लागली. हळुहळू अंधार वाढू लागला. अडखळत ठेचाळत ती चालत होती. आता मात्र गडद अंधार झाला. काय करावे तिला सुचत नव्हते. ती अगदी रडकुंडीला आली. ती होती तेथेच बसली. देवाला हाक मारली. तिला वाटले की, आपण थंडीने गारठून जाणार.

अचानक तिचा हात कोणीतरी घट्ट पकडला. तिला उभी केले. जे काही का जो कोणी होता तो तिचा हात खेचीत तिला घेऊन जाऊ लागला. ती आपोआप 'त्या' मागे जाऊ लागली. किती वेळ चालली, कोण जाणे! तिला अजिबात श्रम पडले नाहीत. तिला 'तो' कॅम्पपर्यंत घेऊन आला होता. आपल्या माणसात आल्यामुळे तिला हायसे वाटले. 'त्याचे' आभार मानण्यासाठी तिने आजूबाजूला पाहिले. पण कोठेच दिसत नव्हता. वाट चुकलेल्या व्यक्तीला मार्ग दाखवून 'तो' नाहीसा झाला होता. वाट दाखवणारा तो होता एक वाटाड्या!

**गावात**

लक्ष्मुमण माझ्या मावशीकडे काम करायचा. एकदा गावाहून त्याला एक तार आली - 'BROTHER SERIOUS . START IMMEDIATELY.'

''दादा, काय लिहिले आहे तारेत?'' त्याने डॉक्टर जयला विचारले. कारण समजल्यावर तो लगेचच गावी निघाला. पंडितने (लिफ्टमन) त्याला एसटीचे तिकीट आणून दिले. गणपतने त्याला मुंबई सेन्ट्रल एसटी बस स्थानकावर सोडले. रात्र फार झाली म्हणून तो गाडीत लगेचच झोपी गेला.

''अहो गाववाले, उठाकी! येथवर तुमचं टिकट संपलीकी, राव,'' बस- वाहकाने त्याला जागे केले.

''ऊर्ळी कांचन गेले?''

''कवाच! आता तुमचा स्टाप आला की, बिगिन उतरा. उशीर होतो. चला. अहो डायवर हाणा गाडी जोरा मंधी.''

''अहो कंडीक्टर, जरा दमाने घ्या. मला उतरू दे.''

लक्ष्मुमण उतरताच, बसची घंटी वाजली आणि त्याला तेथे सोडून पुढे निघून गेली. पहाट झाली असली तरी अंधार होता. धुक्यामुळे नीट दिसत नव्हते. मी अजून झोपेत आहे का, असे वाटल्यामुळे लक्ष्मणने आपले डोळे चोळले, ताणले, पूर्ण जागे असून असे कसे? हा परिसर अपरिचित का वाटतो? धुके अधिकाधिक वाढले होते. इतके वाढले की पुढेपाठी काहीच दिसेनासे झाले. आपल्याला नेमके कोणत्या दिशेने जायचे, हे समजत नव्हते. उजवीकडे, डावीकडे, पाठी का समोर? तो हतबल झाला होता. तिकडे भावाचे काय झाले असेल, हाही विचार मनात येत होता. आणि मग...

अचानक त्याच्या पाठीमागून मानेवर काहीतरी जड वस्तू ठेवल्यासारखे जाणवले. त्याचे हात जड झाले, ते हलविता येत नव्हते, मान हलविणे कठीण झाले आणि त्याची पाऊले आपोआप पुढे पडू लागली, जणू 'जे' काही होते 'ते' त्याला तसे करण्यास भाग पाडीत होते. अशा रीतीने तो चालत गेला. का चालतो, कोठे जात आहोत ते समजत नव्हते. घर आले होते. मानेवरचा भार कमी होत पार गेला. घराचे दार सत्ताड उघडे, घरात बरीच मंडळी, सारे रडत होते, जमिनीवर भाऊ उताणा पडला होता.

''लक्ष्मुमण मुंबईवरून येत आहे. का थांबला नाहीस र पोरा? इतकं दिवस तग धरलास मग थांबला असता तर धाकट्या भाव भेटला नसता का? वर जायची इतकी घाई कशापाई? ह्यो बघ आलाच त्यो,'' असे बोलत आईने हंबरडा फोडला.

भावाचे क्रियाकर्म आटपून एकदोन महिन्यात लक्ष्मुमण मुंबईत परतला. मला भेटला तेव्हा त्याने मला घडलेली घटना सांगितली आणि विचारले, ''विनयदादा, माझ्या मोठ्या भावाचे माझ्यावर लई प्रेम होतं, बघा. तो बराच दिवस आजारी होता. वैदू, डॉक्टर झाले; पण आजार बरा होत नव्हता. मराला टेकला होता म्हणून मला तार केली. मी पोहोचण्यापूर्वी काही तास अगोदर त्याने प्राण सोडले होते. मग 'जे' काही माझ्या पाठीवर बसून मला घराकडे नेले 'ते' माझ्या भावाचा आत्मा तर नसेल?''

तुम्हाला काय वाटते, आत्मा की वाट दाखवणारा तो होता एक वाटाड्या!

**माझा अनुभव**

ह्या दोन गोष्टींवरून मला एका घटनेची आठवण झाली. मी देवाला मानतो आणि देवावर माझी श्रद्धा आहे. पण वारंवार देवळात जाणे, देवाला साकडे घालणे, अमुक एक घडावे म्हणून नवस घेणे आणि नंतर नवस फेडणे हे सारे मला पटत नाही. माझ्या आईची समजूत होती की मी नास्तिक आहे. ती मला सांगत असे, *''आज सोमवार आहे, शंकराला बेल वाहा आणि शंकराच्या पिंडीवर दह्याचा अभिषेक कर...''* किंवा *''शनिवार आहे, मारुतीच्या देवळात जाऊन तेल वाहा .... ''* पण ह्याला विरोध करायचो. मात्र आम्ही सारी तिची मुलं तिच्याबरोबर वज्रेश्वरीच्या आणि कालभैरवाच्या देवळात नियमित जात असू. आणि अजूनही जात असतो. माझ्या आईने माझ्या बायकोच्या डोक्यावर हात ठेवलाय. तिचेही नवस घेणे आणि तो फेडणे चालू असते. तिच्याबरोबर मी काहीवेळा देवस्थानांना गेलो असेन. पण तिच्या सोबत शिर्डीच्या साईबाबांच्या देवळात आजवर कधीही गेलो नाही. ती अनेकवेळा गेली आहे, मुलांसोबत म्हणा किंवा भावाबरोबर, तिचे सोडा, मी शिर्डीला गेलोच नव्हतो. आणि ....

मी ईस्ट इंडियात होतो. आम्हाला शुक्रवार ते रविवार, अशी तीन दिवसांची सुटी आली होती आणि आम्ही गुरुवारी कॅज्युएल लीव्ह सँक्शन करून बुधवारी संध्याकाळच्या 'पंचगणी एक्सप्रेस'ने नाशिकला निघालो. नाशिकला आमचे मेडिकल रेप्रेझेंटेटिव्ह, हिरकलाल बिश्वास (अविश्वास नाही. बंगालीत आणि जर्मन भाषेत 'व' अक्षर नसावे, म्हणून रबिन्द्रनाथ, बीश्वजीत, व आमचा बिश्वास, एव्हडेच काय मलाही ह्या बंगाली कंपनीने 'बिनॉय' (तोंडात रसगुल्ला ठेवून). आता जर्मनीत बघा- Volkswagen होते folkswagen (फोल्क्सवॅगन). जर्मन भाषेत *'V'* उच्चार इंग्रजीतील *'F'* असतो आणि *'W'* उच्चार (pronunciation) 'V' असतो. त्याचप्रमाणे असते बंगाली भाषेचं..असो.)

दुसरा दिवस गुरुवारचा.

*"Hey guys, I have to go to the market, visit chemists and some doctors. While I am working, why don't you guys go to Shirdi? I 'll book your tickets. I know some influential guys in ST. you guys will have comfortable journey, I assure you guys."* (हिरकलालला रजा नव्हती. बिश्वासला 'guys' हा शब्द प्रिय!)

खरोखर त्याने एसटी बसमध्ये आमची उत्तम व्यवस्था केली होती. शिर्डीला आलो खरे. पण .... बापरे किती ही गर्दी! माझे आणि गर्दीचे वावडे! साईबाबांच्या दर्शनासाठी महेश, अशोक, सुरेश आणि चवधरी त्या लांबलचक रांगेत जाऊन उभे राहिले. मला त्यांनी खूप आग्रह आणि विनवण्यादेखील केल्या. गर्दी आणि माझा ३६चा आकडा.

*''तुमचे चालू द्या. तुम्ही दर्शन घ्या. बाबांना माझा नमस्कार''*, असे बोलत मी एका हॉटेलच्या पायऱ्यांवर बसलो. बिश्वासकडे आमचा नाश्ता झाला होता त्यामुळे भूक लागली नव्हती. त्या मंडळींना बराच वेळ लागणार होता. आता त्यांच्या मागेदेखील बरीच माणसे रांगेत आली होती. रांग माझ्यापर्यंत येऊन पोहोचली होती. वेळ घालवण्यासाठी मी लोकांचे निरीक्षण करू लागलो.

१५ मिनिटे झाली असतील नसतील, एक भिकारी (त्यावेळी तरी मला तसे वाटले होते.) माझ्या जवळ आला. अंगावर फाटलेला सदरा व फाटलेली लुंगी, डोक्यावर पांढरी टोपी (स्कल कॅप ), चेहऱ्यावर पांढरी दाढी आणि मिशी आणि भुवयादेखील पांढऱ्या.

*''बेटे, ऐसे बहैठे क्यों हो? बाबा मिलाना नहीं है? साईका दर्शन लेना है ना ? ''*

*''इतने भीड़में? दर्शन यहाँसे करूँगा। मैंने दोस्तोंके साथ नमस्कार भेजा है। मेरे दोस्त लोग बहुत श्रद्धालु और ईशवरके सबसे बड़े है लेकिन मैं नही..''*

मी सारे सांगत असताना तो मला मधेच थांबवून म्हणाला, (मला प्रथमच जाणवले की त्याच्या डोळ्यात एक प्रकारचे तेज होते) *''चल मेरे साथ। मग, येतोस न माझ्या सोबत? मी तुला घेऊन जातो. चल. गर्दी बघू नकोस. ''*(आता हा माणूस चक्क मराठीत बोलत होता.)

मी त्याच्या मागून संमोहित झाल्यासारखा जाऊ लागलो. एक चिचोळी वाट होती. काळोख होता. मला नीटसे दिसत नव्हते. बघताबघता मी थेट साईबाबांसमोर होतो. दर्शन छान झाले. पण तो माणूस.... तो दिसेनासा झाला होता. प्रसाद घेऊन मी मंदिराच्या बाहेर आलो. वाटले होते बाहेर तरी तो भेटेल. पण नाही, त्यानंतर तो माणूस मला कधीच दिसला नाही. मी परत जाऊन त्याच हॉटेलच्या पायऱ्यांवर बसलो. चांगले ५ तासांनंतर आमची स्टाफ मंडळी दर्शन घेऊन आली.

*''काय रे विनय, तू आत कसा घुसलास? आम्ही तुला दर्शन घेताना पाहिले. एवढा पुढे कसा गेलास? आम्ही बरेच मागे होतो. किती पैसे चारले? ''*

मी घुसलो नव्हतो. किंवा मी पैसे चारले नव्हते. पण मला साईबाबांचे चांगले दर्शन घडले होते. कोण होता तो माणूस? मित्र मंडळी व नातेवाईकांनी बरेच तर्कवितर्क केले. कोण होता तो? माझा चमत्कार, वगैरेवर विश्वास नाही. मी भाविक नाही. 'तो कोण होता, मला थेट गाभाऱ्यात कसे नेले आणि नंतर तो गेला कोठे...' हे माझ्या मनातले कोडे अजून सुटले नाही . कदाचित, ह्यावर साधे, सोपे व सरळ निरसन (solution) असेल.

*

## प्रभु तरुण आश्रयदाते

१) सौ. विमल व श्री. माधव नायक,
२) सौ. नलिनी व श्री. रविंद्र रामराव मानकर,
३) सौ. अनामिका बी. ए. एल.एल.बी.
४) कै. नटवर्य नारायण रामराव झावबा
५) कै. सॉ. मोतिराम विनायक जयकर
६) आद्य संपादक कै. विष्णु कृष्ण कोठारे
७) कै. रावसाहेब चंद्रकांत बालमुकुंद वेलकर
८) कै. सौ. सुशीला यशवंतराव कीर्तीकर
कै. सौ. सुशीला व श्री. मोरेश्वर वि. प्रधान
९) सौ. मीरा व श्री. रविंद्र नानूजी दळवी
१०) कै. सौ. शलाका (अरुणप्रभा) शैलकुमार श्रीकृष्णनाथ दळवी
११) कै. श्रीमती चंपुबाई आणि
कै. आनंदराव सुंदरजी धराधर
१२) कै. सौ. रोहिणी (रत्नप्रभा) श्रीकर राणे
१३) सौ. निलीमा व श्री. सूजन केशवराव राणे
१४) कै.श्रीमती रोझाबाई आणि कै. बाळाराम केरोबा नायक
१५) कै. शरद विनायक कीर्तिकर यांच्या स्मरणार्थ अनामिक
१६) कै. सॉ. दिलीप रघुनंदन कोठारे
१७) कै. श्रीमती कमलजा आनंदराव अजिंक्य
१८) कै. दिवाळीबाई व कै. डॉ. वामनराव आनंदराव विजयकर
१९) कै. विष्णुराज बाळाराम नायक
२०) अॅड. सदाशिव आनंदराव धुरंधर
२१) कु. कस्तूर मोठाबाई जयकर
२२) कै. कमलिनी रमाकांत प्रधान
२३) कै. नटवर्य शरद श्रीकृष्णनाथ गणपतराव दळवी
२४) आद्य मराठी लघुलिपीकार कै. भुजंगराव रामचंद्र मानकर
२५) कै. वामन मोरेश्वर प्रभाकर
२६) कै. चंद्रकांत नारायण विजयकर,
कै. कुंजविहारी वाय. जी. तळपदे,
कै. प्रविण चंद्रकांत नारायण, विजयकर,
कै. वैभव कुंजविहारी वाय. जी. तळपदे
यांच्या स्मरणार्थ एक हितचिंतक
२७) कै. डॉ. विद्याधर चंद्रकांत नारायण विजयकर यांच्या स्मरणार्थ हितचिंतक
२८) कै. पूर्णचंद्र केशरीनाथ राव व
कै. सौ. शीला पूर्णचंद्र राव यांच्या स्मरणार्थ
२९) डॉ. राम गोविंदराव नवलकर
३०) सौ. शुभांगी राम नवलकर
३१) सौ. रीटा आणि श्री. मंदार माधवराव नायक
३२) कै. सौ. विजया व श्री. प्रकाश माधव नायक या त्यांच्या आईवडिलांच्या स्मृत्यर्थ उन्मेष प्रकाश नायक
३३) सौ. वृंदा आणि श्री. शाम विनायक जयकर
३४) कै. श्रीमती जयश्री आणि कै. श्री. जयवंत विश्वनाथ कीर्तिकर स्मृत्यर्थ श्री. उमेशचंद्र जयवंत कीर्तिकर
३५) कै. श्रीमती प्रतिमा आणि कै. श्री. धाकलेश्वर बाळाजी जयकर स्मृत्यर्थ सौ. सुप्रिया उमेश कीर्तिकर

## प्रभुतरुणास देणगी

* श्रीम. वृंदा शाम जयकर यांजकडून कै. शाम विनायक जयकरस्मरणार्थ आणि 'प्रभुतरुण'-च्या वर्धापनदिनानिमित्त रु. १००१/-

* श्री. सुरेश आणि सौ. सुरेखा सुरेश नवलकरकडून त्यांची मोठी नात सुरभी स्वप्नील नवलकर बी.कॉम. ग्रेड ए झाल्याबद्दल आणि धाकटी नात आद्या स्वप्नील नवलकर हिला आयसीएसई (दहावी) परीक्षेत ९६.०२ टक्के गुण मिळाल्याप्रीत्यर्थ रु. १०००/-

* श्रीम. स्वाती तारकनाथ जयकर यांजकडून त्यांचे पती कै. श्री. तारकनाथ लक्ष्मीकुमार जयकर यांच्या तिसऱ्या स्मृतिदिनाप्रीत्यर्थ रु. ५००/-

देणगीदारांचे आभार

*

## अभिनंदन

* अॅड. सौ. केतकी राजन जयकर यांनी दूरदर्शनवर 'अनवट स्वाद'मध्ये पाठारे प्रभु खाद्यपदार्थ करून दाखवले.

* दी कीर्तिकर फॅमिली प्रभादेवी चॅरिटेबल इन्स्टिट्यूट या संस्थेकडे असलेल्या ३०४ वर्षांच्या जुन्या प्रभावती देवीच्या मंदिराचे वैशिष्ट्य जाणून एलफिन्स्टन रोड स्टेशनचे नाव 'प्रभादेवी' असे करण्यात आले. इ. स. १७१४ मध्ये उभारल्या गेलेल्या या देवळाला आता रेल्वेचाही नवीन आयाम लाभला.

* प्रा. सुहासिनी कीर्तिकर यांची मुंबई विद्यापीठाच्या 'पेन्शनर्स असोसिएशन' मध्ये समिती सभासद म्हणून नेमणूक झाली.

* सौ. उज्ज्वला र. ब्रह्मांडकर यांचा'परिवर्तन' नावाचा कथासंग्रह नुकताच वाचनात आला. अलिकडच्या जगातील ताणतणाव आणि मानसिक, कौटुंबिक संघर्षावर आधारित कथा वाचनप्रेमींना आवडतील अशाच आहेत. अभिनंदन.

## परीक्षेतील सुयश

**बी. कॉम. (मुंबई विद्यापीठ)**
कु. सुरभी स्वप्नील नवलकर, 'ए' ग्रेड
श्री. शौनक कौशिक जयकर

**उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (बारावी)**
कु. वरदा राहुल नायक ९४ %
६११/६५० गुण

**मास्टर ऑफ टुरिझम मॅनेजमेंट (व्हेरायज सिंकन युनिव्हर्सिटी)**
श्री. आदित्य अलर्क देसाई

**मास्टर ऑफ आर्किटेक्चर (युनिव्हर्सिटी ऑफ मिशियन)**
श्री. अभिषेक अलर्क देसाई

**बी.एड (मुंबई विद्यापीठ)**
शलाका नीलेश विजयकर, ए ग्रेड

**बी.कॉम**
श्री. निमिष नीलेश विजयकर, ए ग्रेड

*

## प्रभुतरुणाची डायरी

### मरण

| | | | |
|---|---|---|---|
| २७-०७-१८ | श्री. मनोज माधव नायक, | वय ७४, | प्रभादेवी |
| २९-०७-१८ | डॉ. श्री. विनोद आनंदराव धुरंधर, | वय ९०, | विलेपार्ले |
| ३०-०७-१८ | श्री. नंदकुमार शामराव जयकर | वय ८८ | खार |

(पान २ कॉलम ३ वरून)
व्यवहारकरांनी सुधीर फडके यांचे 'तुझे गीत गाण्यासाठी' गाऊन भक्तिभाव जागवला. या सर्वांसह लक्षणीय असे सूर कानात गुंजत राहिले ते रॉनिका विजयकरांचे, श्री. प्रदीप राणे यांचे, आसावरी धुरंधर, क्षमा कोठारे यांचे, अन् अशा अनेकांचे. या अनेकांमध्ये स्वराधीश असलेल्या काहींची नावे इथे राहून गेली असतील; कारण परिणाम होता श्रोत्यांवर तो भक्तिभावाचा, सुरांचा! समाजाच्या संयुक्त चिटणीस सौ. नीता सेंजित यांनी शेवटी आभार मानले आणि देणग्यांची माहिती दिली. सौ. स्वप्ना विनित जयकर यांजकडून त्यांच्या चिरंजीवाच्या या यात्रेतील प्रथम सहभागाबद्दल रु. ५००/- देणगी लाभली. यात्रेकरूंना श्रीम. प्रमिला तळपदेंकडून कॉफीपान आणि स्वाती जयकर यांजकडून पेढ्यांचा प्रसाद लाभला. सौ. नीता आणि मिलिंद सेंजित यांनीही देणगी दिली. व्यंकटेशाला नारळ, पुष्पहार श्री. अभिजित विजयकरकडून अर्पण झाला. या कार्यक्रमाला गजानन मांजरेकर यांचा वाद्यमेळ साथीला होता.

या वाद्यमेळात श्रीराम प्रभुदेसाई, वसंत यांची साथ होती. श्री. प्रदीप राणे आणि अवधूत चौबळ यांचा तबला ठेका धरीत होता; तर साऊंड व्यवस्था बाबू यांची होती. कार्यक्रमाची अखेर अर्थातच भैरवीने झाली. 'आनंदाचे डोही आनंद तरंग' या भैरवीत सहभाग होता मिलींद सेंजित, वर्षा धुरंधर, रश्मी व्यवहारकर, हर्षद विजयकर, आसावरी धुरंधर, क्षमा कोठारे यांचा. श्रोत्यांना या अभंगयात्रेत 'आनंदाचे डोही आनंद तरंग' असाच अनुभव आला. १९-८-१८ रोजी समाजाच्या निवडणुकीविषयी श्रोत्यांना जाग आणीत हा सुरेल कार्यक्रम श्रोत्यांच्या मनी भक्तिभाव जागवीत संपन्न झाला.

*

## पाठारे प्रभु महिला समाज, पाठारे प्रभु सोशल समाज

पाठारे प्रभु महिला समाज आणि पाठारे प्रभु सोशल समाज या दोन्ही संस्थांचे वार्षिक अहवाल सभासदांना प्राप्त झाले. हे अहवाल आवश्यक माहितीने परिपूर्ण आहेत. संस्थांची यशस्वी वाटचाल त्यातून कळते. अभिनंदन.

*

(पान ४ कॉलम ४ वरून)
प्रार्थना समाजची स्थापना १८६७ मध्ये झाली. भाऊच्या धक्याचे शिल्पकार असलेले लक्ष्मण हरिश्चंद्र अजिंक्य यांचे चिरंजीव रामचंद्र लक्ष्मणजी हे प्रार्थना समाजच्या संस्थापक सदस्यांपैकी एक होते. ज्यांना दिवसा शिक्षण घेणे शक्य नाही त्यांच्यासाठी शहराच्या विविध भागात रात्रीच्या शाळा प्रार्थना समाजने काढल्या.

विठ्ठलदास ठाकरसी नावाचे एक धनिक उद्योगपती मुंबईत होऊन गेले. स्त्रियांच्या उन्नतीला उपयोगी पडणाऱ्या अनेक संस्थांना मदत करता करता त्या ध्येयाला एक रकमी पंधरा लाख रुपयांची देणगी देऊन त्यांनी अखिल भारतीय रूप दिले. १९१८ हे संपूर्ण वर्ष त्यांनी जग प्रवासात घालविले. जपान मधील 'स्त्रियांचे विद्यापीठ', त्यांचे सर्व कार्यक्रम नजरेखाली घालून भारतीय स्त्रियांसाठी अपरिहार्य व उपयुक्त अशा शिक्षणासाठी 'श्री नाथीबाई दामोदर ठाकरसी' महिला विद्यापीठाची स्थापना केली.

एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात आधी मिशनऱ्यांनी व नंतर कंपनी सरकारने विद्यादानाला सुरूवात केली. या नानाविध संस्थांचा व्याप पाहिल्यास एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धापासून लोकशिक्षण कशा प्रकारे वाढले याचा अंदाज येतो. आता तर मुंबई इलाख्यात अनेक लोकोपयोगी विषयांची महाविद्यालये स्थापना झाल्यामुळे कोणत्याही ज्ञानक्षेत्राची उणीव राहिलेली नाही.

हे मासिक मुद्रक, प्रकाशक श्रीमती सुहासिनी कीर्तिकर यांनी मालक बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुण करिता मे. स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ, शाह अँड नाहर इंडस्ट्रीयल इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-४०००१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४००१०२ येथे प्रकाशित केले.
संपादक: श्रीमती सुहासिनी कीर्तिकर RNI NO. 14613/67